# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९५ | किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८७९ : सरोजिनी नायडू यांचा जन्मदिन.
१९०१ : गायक व नट भाऊराव कोल्हटकर यांचे निधन झाले.
१९१४ : लल्फान्सो बर्टिलान या मानववंश शास्त्रज्ञाचे निधन झाले.
१९७७ : शरीर शास्त्रज्ञ जयवंतसिंग यांचे निधन झाले.

सेन्सेक्स ८३,६७४.९२ -५५८.७२ (०.६६%)
डॉलर ₹ ९०.५८

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १६ |
| दिल्ली | २४ | ११ |
| मुंबई | ३५ | २१ |
| नागपूर | ३२ | १८ |
| पुणे | ३३ | ११ |

**सुविचार**

खरा आनंद तो आहे, जो इतरांना सुख देण्यातून मिळतो.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५९ संध्या-६:२५

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६०,२२०/- २,९५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन : मुख्यमंत्री फडणवीस



## • टाटा ट्रस्ट, नाम फाउंडेशन सोबत करारावेळी व्यक्त केला विश्वास

**वृत्तसंस्था । मुंबई**

महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे उपस्थित होत्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टचे सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री (पान २ वर)

**➢ कराराचा उद्देश**

**सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि लास्ट–माईल कनेक्टिव्हिटी याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.**

## थोडक्यात

### निंभोऱ्यात तरुणावर चाकू, फायटरने हल्ला

**अमळनेर ।** तालुक्यातील निंभोरा येथे अंगणात पत्नी व वहिनी भांडी घासत होत्या. घरासमोर कृष्णा बाळू भिल्ल आणि रोहित अरुण वाघ हे दोघे मोठ्याने शिवीगाळ करत होते. सैंदाणे यांनी दुसरीकडे जाऊन शिवीगाळ करण्यास सांगितले. याचा राग आल्याने कृष्णा भिल्ल याने खिशातील चाकू काढून सैंदाणे यांच्यावर वार केला. हा वार अडवताना त्यांच्या उजव्या हाताच्या तळव्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर कृष्णाने दुसऱ्या खिशातील फायटरने काढून मारहाण केली.

### पार्थ पवार यांचा राज्यसभा प्रवेश निश्चित?

**नवी दिल्ली ।** महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला असून पार्थ पवार यांचा राज्यसभा प्रवेश आता निश्चित मानला जात आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली, त्यांच्यात सुमारे ४० मिनिटे महत्त्वपूर्ण चर्चा झाली. या बैठकीत मोंदीनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला.

## ‘काम न करणाऱ्या आमदार, खासदारांना घरी बसविण्याचा अधिकार द्या

### राघव चड्ढा यांची राज्यसभेत मागणी

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

**‘जनतेची कामे न करणाऱ्या पुढाऱ्यांना घरी बसवा’, अशी ओरड सामान्य लोकांकडून अनेकदा केली जाते. मात्र भारतात तसा कोणताही कायदा नसल्यामुळे एकदा निवडून आल्यानंतर बरेचसे लोकप्रतिनिधी पाच वर्षांसाठी निर्धास्त होतात. निष्क्रिय असलेले आणि जनतेची कामे न करणाऱ्या लोकप्रतिनिधींना परत पाठवण्याचा अधिकार जनतेला द्या, अशी मागणी आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांनी राज्यसभेत केली आहे. ‘राईट टू रिकॉल’ हे अस्त्र जनतेला मिळावे, अशी मागणी त्यांनी केली.**



जनतेला एखाद्याला जसा निवडून देण्याचा अधिकार आहे, तसा त्याला खाली खेचण्याचाही अधिकार असला पाहिजे, असे अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलत असताना खासदार राघव चड्ढा म्हणाले. ‘राईट टू रिकॉल’ या अधिकाराबाबत बोलताना राघव चड्ढा यांनी सांगितले की, नागरिकांचे सक्षमीकरण करण्यासाठी हे आयुध असणे गरजेचे आहे. या आयुधामुळे राजकीय पक्षांना चांगले आणि जबाबदार उमेदवार द्यावे लागतील. मतदारांना निवडून देण्याचा आणि गरज पडल्यास त्यांना घरी बसवण्याचा अधिकार मिळाल्यास लोकशाही आणखी बळकट होईल.

## महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास केंद्रीय संस्थांमार्फत करा!

### • खा.नीलेश लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना दिले निवेदन

**वृत्तसंस्था । अहिल्यानगर**

**महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या फसवणूक प्रकरणाचा तपास ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा. तसेच भविष्यात अशा फसव्या योजनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीमध्ये भेट घेऊन केली आहे.**



खासदार लंके यांनी यापूर्वी पंतप्रधानांच्या भेटीत त्यांना रायगड किल्ल्याच्या भेटीचे निमंत्रण दिले होते. आता गृहमंत्री शहा यांची भेट घेऊन गुंतवणूकदारांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत जिल्ह्यातील गुंतवणूकदारांचा प्रश्न प्रचाराचा बनला होता. याच मुद्द्यावरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे व त्यांचे चिरंजीव माजी खासदार सुजय विखे यांनी खासदार लंके यांचे नाव न घेता त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठवली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महापालिकेच्या निवडणूक प्रचार सभेत गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास सीबीआयकडे सोपवण्यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांची भेट घेणार असल्याचे जाहीर केले होते.

खासदार लंके यांनी यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री शहा यांना निवेदन दिले. राज्यात गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली. ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतल्यानंतर पैसे परत न देणे, धमकावणे, आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप संबंधित संस्थांवर आहेत. या प्रकरणाची ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा, (पान २ वर)

## प्राथमिक शिक्षणाधिकारीपदी निलेश पाटील रुजू

**प्रतिनिधी । जळगाव**



**येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा पदभार निलेश पाटील यांनी गुरुवारी दि. १२ फेब्रुवारी रोजी सकाळी स्वीकारला. यावेळी विविध संघटनेच्या पदाधिकारी व नेत्यांनी तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन कारकिर्दीसाठी सदिच्छा दिल्या.**

वर्षभरापासून प्राथमिक शिक्षणाधिकारी हे पद रिक्त होते. हा पदभार सध्या माध्यमिक शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्याकडे होता. मागील आठवड्यात शिक्षण विभागाने आदेश काढून निलेश पाटील यांची जळगाव येथे नियुक्तीचे पत्र काढले होते. आता निलेश पाटील यांच्याकडे पदभार आल्यामुळे प्राथमिक विभागाला कायमस्वरूपी शिक्षण अधिकारी मिळाले आहेत. (पान २ वर)

## ३.२५ लाख कोटी रुपयांच्या ११४ राफेल विमानखरेदीवर शिक्कामोर्तब

**वृत्तसंस्था । नवी दिल्ली**

केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण अधिग्रहण परिषदेने गुरुवारी तिन्ही सशस्त्र दलांसाठी विविध अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी दिली. उच्च अधिकाऱ्यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, यामध्ये फ्रान्सकडून ११४ राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या कराराचाही समावेश आहे.

संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून सहा पी-८आय (-८) सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे.

### ९० विमानांचं उत्पादन भारतात होणार



फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या १७ ते १९ फेब्रुवारीदरम्यान भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या भारत दौऱ्याच्या काही दिवस आधी ही मंजुरी देण्यात आली आहे. उच्च अधिकाऱ्यांनी द इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, ११४ राफेल लढाऊ विमानांपैकी ९० विमाने स्वदेशी पद्धतीने तयार करण्याची योजना आहे, ज्यामध्ये अंदाजे ५० टक्के स्वदेशी सामग्री असेल.

यापूर्वी भारतात उत्पादित होणाऱ्या विमानांमध्ये ३० टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर करण्याची चर्चा झाली होती. पण अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले की, पुढील चर्चेत हे प्रमाण सुमारे ५० टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल. शिवाय, विमानांवर भारतीय शस्त्रे आणि प्रणाली बसवण्याचे पूर्ण अधिकार भारताला असतील. व्यावसायिक वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर आणि सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने अधिग्रहणाला मान्यता दिल्यानंतर अंतिम करारावर स्वाक्षरी केली जाईल.

भारतीय हवाई दलाकडे आधीच ३६ राफेल विमाने आहेत आणि भारतीय नौदल पुढील काही वर्षांत २६ राफेल एम विमाने वाहक ऑपरेशन्ससाठी समाविष्ट करेल. राफेल विमानांच (पान २ वर)

## बंगळुरूमध्ये घोड्यांना ‘ग्लँडर्स’चा प्रादुर्भाव, मालेगाव अलर्ट मोडवर!

**वृत्तसंस्था । मालेगाव**

कर्नाटकातील बंगळूर येथील प्रसिद्ध रेसकोर्समध्ये घोड्यांना ङ्गग्लँडर्सफ या अत्यंत संसर्गजन्य आणि जीवघेण्या आजाराची लागण झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर मालेगाव महानगरपालिका प्रशासन सतर्क झाले असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विशेष नियमावली जाहीर करण्यात आली आहे. कर्नाटक पशुसंवर्धन विभाग व सार्वजनिक आरोग्य विभागाकडून मिळालेल्या अहवालानंतर मालेगाव आरोग्य विभागाने हे पाऊल उचलले आहे.

## नाशिकमध्ये प्रथमच राज्यस्तरीय आदिवासी साहित्यिक व सांस्कृतिक संमेलन

### संकल्प आदिवासी युवा जागृती संघटना; जिव्हाळा यांच्या पुढाकारातून संमेलनाचे आयोजन

**वृत्तसंस्था । नाशिक**

**शहरात प्रथमच राज्यस्तरीय आदिवासी साहित्यिक व सांस्कृतिक संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून हे संमेलन १४ फेब्रुवारी रोजी पेठरोडवरील प्रादेशिक परिवहन कार्यालयाजवळील शासकीय मुलांचे वसतिगृह येथे होणार आहे. संकल्प आदिवासी युवा जागृती संघटना आणि जिव्हाळा यांच्या पुढाकारातून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी दिवस भरगच्च असणार आहे.**

सकाळी ‘संस्कृती दर्शन’ फेरीने संमेलनाची सुरुवात होणार असून संध्याकाळी ८ वाजेपर्यंत विविध सत्रे पार पडतील. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी विदर्भातील ज्येष्ठ साहित्यिका कुसुम आलाम असतील. उद्घाटन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून खा. भास्कर, भगरे तसेच नितीन पवार, दिलीप बोरसे, हिरामण खोसकर या आमदारांसह माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, माजी महापौर रंजना भानसे, आदिवासी आयुक्त लीना बनसोड, उपायुक्त दिनकर पावरा, पोलीस उपायुक्त चंद्रकांत खांडवी, आदिवासी प्रकल्प अधिकारी अर्पिता ठुबे, इत्यादी उपस्थित राहणार आहेत.

संमेलनात आदिवासींचे वास्तव जीवन साहित्यात आहे का ?, या विषयावर परिसंवाद होणार आहे. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संजय लोहकरे असतील. डॉ. पद्माकर सहारे, डॉ. सुलतान पवार, डॉ. मधुचंद्र भुसारे, साहित्यिक रवी बुधर आणि लेखक राजू ठोकळ हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. मुलाखत सत्रात साहित्यिक देवचंद महाले विविध आदिवासी साहित्यिक, राजकारणी व कलाकारांच्या मुलाखती घेणार आहेत. महिला सत्राच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा चौरे असून या सत्रात आदिवासी महिलांच्या प्रश्नांवर चर्चा केली जाणार आहे. यानंतर युवा कवी संतोष पावरा यांच्या सहभागातून नवोदित कवी संमेलन होईल.

निमंत्रित कविसंमेलन ज्येष्ठ कवी तुकाराम धांडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. याशिवाय सांस्कृतिक फेरी, लघुनाट्य, आदिवासी पारंपरिक नृत्य, चित्रप्रदर्शन आदी (पान २ वर)

## ट्रॅक्टरच्या धडकेत मोटारसायकलस्वार ठार

**प्रतिनिधी । पाचोरा**

**भरधाव ट्रॅक्टरने मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याने मोटारसायकलवरील ४० वर्षीय शेतमजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उत्राण ते भातखंडे बुद्रुक (ता. भडगाव) दरम्यान घडली. याप्रकरणी पाचोरा पोलिस स्टेशनमध्ये अपघाताची नोंद करण्यात आली आहे. सदरची नोंद शून्य क्रमांकाने कासोदा पोलिस स्टेशनमध्ये वर्ग करण्यात आली आहे.**

समाधान काशिनाथ पाटील (वय ४० वर्ष रा. उत्राण ) हे शेतमजुरी करुन आपला व परिवाराचा उदरनिर्वाह चालवित होते. समाधान पाटील हे ११ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता उत्राण येथून गिरड येथे त्यांचे भाच्याला मुलगा झाला असल्याने बघण्यासाठी येथे होते.

दरम्यान उत्राण ते भातखंडे बुद्रुक दरम्यान समोरून भरधाव येणाऱ्या ट्रॅक्टरने समाधान पाटील यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# संपादकीय

## अविश्वासाचे उपसले हत्यार

लोकसभेचे विद्यमान अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या विरोधात विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली असल्याने आगामी कालावधीमध्ये या विषयावर चर्चा होणे अपेक्षित आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांविषयी पक्षपाती भूमिका घेणे आणि विरोधी पक्षाच्या खासदारांना जनहिताचे मुद्दे उपस्थित करण्यापासून रोखल्याचा आरोप करीत सर्व विरोधी पक्षांनी अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिली आहे. संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाल्यापासून गेल्या काही दिवसांमध्ये लोकसभेच्या सभागृहामध्ये ज्या प्रकारे कामकाज होत आहे किंवा ज्या प्रकारे अपेक्षित कामकाज होत नाही ते पाहता विरोधी पक्षांची लोकसभा अध्यक्षांबाबतची अशी भूमिका असणे साहजिकच आहे. अर्थात, केवळ आपला अधिकार स्पष्ट करण्यासाठीच विरोधी पक्षांनी हे हत्यार उपसले आहे. कारण एक तर अविश्वास प्रस्तावाची नोटीस दिल्यानंतर सभागृहाने ती स्वीकारावी लागते आणि स्वीकारल्यानंतर त्यावर चर्चा करून तो अविश्वास प्रस्ताव मंजूर करावा लागतो. ही सर्व प्रक्रिया पाहता आणि सध्याच्या सत्ताधारी पक्षाचे बळ पाहता विरोधी पक्षांच्या या मोहिमेमध्ये त्यांना यश मिळेल, अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. पण लोकसभेमध्ये सध्या ज्या प्रकारचे कामकाज चालले आहे, त्यासाठी सर्वोच्च पातळीचा विरोध करण्याचे एक हत्यार म्हणूनच विरोधी पक्षांनी अविश्वास ठरावाची नोटीस दिली आहे. अर्थात ही नोटीस आल्यानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या नोटीसीवर निर्णय होईपर्यंत आपण सभागृहात येणार नाही, अशी भूमिका तातडीने घेतली हेसुद्धा बरे झाले. खरे तर संसदीय कायद्याप्रमाणे जरी अध्यक्षांवर अशा प्रकारे अविश्वास नोटीस बजावण्यात आली असली, तरी त्यांना कामकाजात भाग घेण्यापासून रोखता येत नाही. पण आपली नैतिक जबाबदारी म्हणून ओम बिर्ला यांनी लोकसभेत हजर न राहण्याची भूमिका घेतली. आजपर्यंतच्या इतिहासाचा विचार करता तीन वेळा लोकसभा अध्यक्षांवर अविश्वास प्रस्तावाचा प्रयत्न करण्यात आला होता, पण तिन्ही वेळा तो फसला होता. लोकसभेचे पहिले अध्यक्ष जी. व्ही. मावळणकर यांच्यावर १९५४ मध्ये, हुकुमसिंग यांच्या विरोधात १९६६ मध्ये आणि बलराम जाखंड यांच्या विरोधात १९८७ मध्ये अशाच प्रकारे अविश्वासाचे प्रस्ताव विरोधी पक्षांतर्फे दाखल करण्यात आले होते. पण या प्रकारच्या प्रस्तावांना कोठेही यश मिळाले असे दिसून आले नाही. साहजिकच ओम बिर्ला यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्तावाची गतही तशाच प्रकारची होणार असली, तरी या निमित्ताने सभागृहातील विरोधी पक्षांचा सभागृहाच्या अध्यक्षांवर विश्वास नाही ही गोष्ट अधोरेखित करण्याचे काम मात्र विरोधी पक्षांनी केले आहे. भारतीय लोकशाहीच्या तत्त्वांचा विचार करता लोकसभेचा अध्यक्ष हा लोकसभेचा सदस्यच असतो आणि कोणत्यातरी पक्षातर्फे तो निवडून आलेला असतो. पण एकदा तो लोकसभेचा अध्यक्ष म्हणून निवडून आला तर त्याने निःपक्षपातीपणे काम करावे, असे अपेक्षित असते. पण गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये सर्व सरकारांच्या राजवटीमध्ये अध्यक्षांनी नेहमी सत्ताधारी पक्षांची बाजू घेण्याचे काम केले आहे. याची अनेक उदाहरणे सांगता येतात. सरकारला अडचणीत आणेल अशा प्रकारचा कोणताही विषय सभागृहासमोर येणार नाही किंवा विरोधी पक्षांची बाजू वरचढ होते आहे असे दिसल्यास त्याप्रमाणे योग्य कारवाई करणे असे अनेक निर्णय अध्यक्ष घेत असतात. चालू अधिवेशनामध्ये विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना बोलू न देण्याचा मुद्दा सर्वाधिक गाजला होता. या व्यतिरिक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लोकसभेत न येण्याचा सल्लाही ओम बिर्ला यांनी दिला होता.

# पायऱ्या नसल्याने वर्गात चढण्यासाठी विद्यार्थ्यांना करावी लागते जीवघेणी कसरत!

## सिद्धेश्वर नगर शाळेची दुर्दशा उघडकीस

प्रतिनिधी । वरणगाव

**भुसावळ तालुक्यातील वरणगाव येथील सिद्धेश्वर नगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत येते, तिची स्थिती गंभीर आहे. शाळेतील विद्यार्थ्यांना वर्गात जाण्यासाठी पायऱ्या नसल्यामुळे रोजचं जीवघेणी कसरत करावी लागते, तर शाळेतील मुतारी, शौचालय, वर्गाजवळील वरांडा आणि कंपाऊंड ही अत्यंत खराब स्थितीत आहेत. पावसाळ्यात इमारतीच्या भिंतींवर गळती होते, त्यामुळे वर्गातील परिस्थिती आणखी बिकट होते. यामुळे विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, तसेच शिक्षणावरही परिणाम होत आहे.**



पालकांचे म्हणणे आहे की, शाळेच्या इमारतीच्या दुर्दशेमुळे मुलांना शिक्षण घेणे सुरक्षित नाही. पायऱ्या नसल्यामुळे छोटे विद्यार्थी अपघाताला सामोरे जात आहेत. तसेच शाळेची गळती आणि खराब शौचालयांमुळे स्वच्छतेचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रशासनाने या शाळेवर तातडीने लक्ष द्यावे,अशी मागणी होत आहे.

स्थानिक नागरिकांचा दावा आहे की, शाळेची दुर्दशा फक्त विद्यार्थ्यांवर नाही तर संपूर्ण समाजातील शिक्षणाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे करते. जर प्रशासनाने आता उपाययोजना केली नाही, तर भविष्यातील पिढ्यांना सुरक्षित आणि दर्जेदार शिक्षण मिळण्यास गंभीर अडथळा निर्माण होईल. शाळा प्रशासनाने अनेकदा तक्रारी पाठवल्या असूनही जळगाव जिल्हा परिषद आणि शिक्षण विभागाकडून अद्याप उपाययोजना झालेली नाही, अशी चिंता पालक व शिक्षक व्यक्त करत आहेत. शाळेच्या दुर्दशेमुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक अडचणींचा सामना नाही, तर त्यांच्या सुरक्षिततेवरही प्रश्न निर्माण झाला आहे.

### ➤ शिक्षक काय म्हणाले

**ही शाळा तालुक्यातील पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देते, तरीही मुलांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष केले गेले आहे. शाळा सुरक्षित आणि आदर्श शिक्षण देण्यासाठी इमारत व सुविधा तातडीने दुरुस्त करण्याची गरज आहे, असे शिक्षकांनी सांगितले.**

# हिंद दी चादर शहिदी समागम कार्यक्रमांची जिल्ह्यात व्यापक स्वरुपात जनजागृती करावी : जिल्हाधिकारी

प्रतिनिधी । धुळे

**हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा कार्यक्रम २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी नवी मुंबईतील खारघर येथे होत आहे. यानिमित्त धुळे जिल्ह्यात या कार्यक्रमांची व्यापक स्वरुपात जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी दिले आहे.**

हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीस आ.मंजुळा गावित, अनुप अग्रवाल, जि.प. सीईओ अजिज शेख, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत साबळे, तहसीलदार साहेबराव सोनवणे, अरुण शेवाळे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी मोहनलाल वाडीले, समिती सदस्य जयवंत पवार, डॉ. साईदास चव्हाण, सुरेश कुंदनाणी, नवलसिंग पवार, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते म्हणाल्या की, हिंद दी चादर श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिर्मित्त त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा, यासाठी सर्व शाळा, महाविद्यालयामध्ये श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवन कार्यावर आधारित गीत गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा प्रभात फेरीचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# अंजनसोडे गावात आता आठवड्यातून एक दिवस महसूल सेवा थेट गावात

प्रतिनिधी । भुसावळ

**तालुक्यातील अंजनसोडे येथील नागरिकांना महसूलविषयक कामांसाठी येथील तलाठी कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत होत्या. यामुळे शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी तसेच वयोवृद्ध नागरिकांना मोठा मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर तहसीलदार निता लबडे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत अंजनसोडे गावातच आठवड्यातून एक दिवस महसूल सेवा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत.**

अंजनसोडे येथील रहिवासी गोकुळ बाबुराव चौधरी व अतुल धनराज चौधरी यांनी दि.२८ जानेवारी रोजी तहसील कार्यालयात लेखी निवेदन सादर करून गावातच महसूल अधिकारी उपस्थित राहण्याची मागणी केली होती. या मागणीची गंभीर दखल घेत तहसीलदार निता लबडे यांनी ग्राममहसूल अधिकारी प्रियंका चौधरी अंजनसोडे यांना आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी अंजनसोडे येथे उपस्थित राहून शासकीय कामकाज व नागरिकांना आवश्यक सेवा पुरविण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

त्यानुसार, आता अंजनसोडे येथील नागरिकांना शासकीय दाखले, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी तसेच इतर महसूलविषयक कामांसाठी गावाबाहेर जावे लागणार नाही. तसेच बुधवारी शासकीय सुटी असल्यास पुढील कार्यदिवशी गावात उपस्थित राहून प्रलंबित कामे पूर्ण करण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे अंजनसोडे गावातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, प्रशासनाच्या या लोकाभिमुख निर्णयामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

# गायकवाड इंग्लिश क्लासमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील गायकवाड इंग्लिश क्लासमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साही व भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**




कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, भाषणे, कविता, नृत्य व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या क्लासमधील आठवणी सांगत शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी बोलताना क्लासचे संचालक प्रा. सतीश गायकवाड म्हणाले की, सन २०१० पासून सुरू असलेल्या गायकवाड इंग्लिश क्लासमधील विद्यार्थ्यांचा प्रगतीचा आलेख नेहमीच चढता राहिला आहे. इंग्लिश विषयातील ग्रामर, रायटिंग स्किल्स, वाचन व पाठ्यपुस्तकांचे अध्यापन अतिशय शिस्तबद्ध व प्रभावी पद्धतीने केले जाते.

ते पुढे म्हणाले की, नियमित सराव, संकल्पना स्पष्ट करण्यावर दिला जाणारा भर व वैयक्तिक मार्गदर्शनामुळे विद्यार्थी दिवसेंदिवस इंग्लिश विषयात मोठी प्रगती करत आहेत. याचाच सकारात्मक परिणाम म्हणून विद्यार्थी इंग्लिशमध्ये चांगले गुण मिळवून यश संपादन करत आहेत.

या कार्यक्रमाला प्रा.राजेश गायकवाड, आकाश गायकवाड, पूजा मॅडम, ज्ञानेश्वरी यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी दहावीच्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला व त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या निरोप समारंभाने सर्वांच्या मनात अविस्मरणीय आठवणी निर्माण केल्या. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# पान १ वरुन

पान १ वरुन

### स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून......

सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षापासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देऊन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे. नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला,नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा ट्रस्टचीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. टाटा ट्रस्ट चे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे.

### महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या ......

अशी मागणी करण्यात आली आहे. याबरोबरच पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी कार्यालय दिल्लीतील 'सेवा तीर्थ' या नवीन इमारतीत स्थलांतर झाल्यानंतर लोकप्रतिनिधींना तेथे अधिकृत कामासाठी प्रवेश नाकारला जात आहे, त्यामुळे गंभीर आजारी नागरिकांच्या मदत प्रकरणांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. लोकप्रतिनिधींना त्या विभागात प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशा मागणीची निवेदनही लंके यांनी गृहमंत्र्यांना दिले. याबरोबरच पुणे येथील गुन्हा शाखेच्या युनिट- १३ (गुप्तचर विभाग) कामकाज न्यायालयाच्या आदेशानुसारही अद्याप सुरू झालेले नाही. तसेच तेथील १७० कर्मचाऱ्यांचे १८ महिन्यांचे वेतन थकीत राहिले आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबावर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार युनिट- १३ चे कामकाज तातडीने सुरू करून सर्व थकीत वेतन अदा करावे, अशीही मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

### ३.२५ लाख कोटी रुपयांच्या......

या खरेदीमुळे लॉजिस्टिक्स आणि प्रशिक्षण खर्च कमी होण्यास मदत होईल. अमेरिकेकडून ६ पी-८आय विमानांसाठी करारालाही मंजुरी - संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून सहा पी-८आय सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे. नोव्हेंबर २०१९ मध्ये संरक्षण अधिग्रहण परिषदेने सहा पी-८आय विमानांच्या खरेदीला मान्यता दिली होती. त्यानंतर अमेरिकेच्या संरक्षण विभागाने एप्रिल २०२१ मध्ये अंदाजे २.४२ अब्ज डॉलर्स किमतीच्या विक्रीला मान्यता दिली. पण हा करार आतापर्यंत होऊ शकला नाही. आता विमानाच्या किमतीत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे. भारत आणि अमेरिका गेल्या काही महिन्यांपासून या कराराच्या तपशीलांवर चर्चा करत असून पुन्हा प्रयत्न सुरू केले आहेत. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे आणि बोईंगच्या अधिकाऱ्यांचे एक शिष्टमंडळ यासंदर्भात भारतात आले होते. गेल्या महिन्यात भारतातील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांनी एका अमेरिकन शिष्टमंडळासह संरक्षण सचिव आर. के. सिंग यांची भेट घेतली होती.

### प्राथमिक शिक्षणाधिकारीपदी......

यामुळे आता प्राथमिक शिक्षण विभागाचे कामकाज वेगाने पुढे जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे दिवसभरात निलेश पाटील यांची विविध संघटनांच्या नेत्यांनी व अधिकाऱ्यांनी भेट घेऊन त्यांना सदिच्छा दिल्या.

### नाशिकमध्ये प्रथमच......

कार्यक्रमांचीही रेलचेल असणार आहे. काही लेखकांच्या पुस्तकांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. राज्यातील आदिवासी साहित्य, संस्कृती आणि विचारप्रवाह यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मोबाईल सोडा, मैदानी खेळांत रममान व्हा : एम.व्ही.पाटील

प्रतिनिधी । चोपडा

**पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था संचालित, पंकज बालसंस्कार केंद्रात गुरुवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी हिवाळी क्रीडा स्पर्धांचा रंगतदार व उत्साहपूर्ण कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन अध्यक्षस्थानी असलेले मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील व पालक प्रतिनिधी यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.**



कार्यक्रमाच्या सुरुवातीला विभाग प्रमुख मीना माळी यांनी प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या जीवनात अभ्यासासोबत खेळाचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना विकसित होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री महाजन यांनी केले. स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी धावणे, संगीत खुर्ची, बादलीत बॉल टाकणे, बॅलेंसिंग अशा विविध रोमांचक खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक स्पर्धेत मुलांचा जोश, चिकाटी आणि खेळाडूवृत्ती विशेष लक्षवेधी ठरली. संपूर्ण परिसरात आनंद, टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक एम. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत मोबाईलचा अतिरेक टाळून मैदानी खेळ, योगासन, नियमित व्यायाम आणि ध्यानधारणेकडे वळणे आवश्यक आहे, असे त्यांनी मार्गदर्शन केले. सर्वांगीण विकासासाठी शारीरिक, मानसिक व बौद्धिक सुदृढता महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या हिवाळी क्रीडा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, आत्मविश्वास आणि उत्साह दुणावल्याचे चित्र पाहायला मिळाले. या उपक्रमाचे पालक व उपस्थितांनीही कौतुक केले.

## ● निधन वार्ता

### मनोज सोनवणे



**जळगाव** । शहरातील रिधुर वाडा शनिपेठ जळगाव येथील रहिवाशी मनोज भगवान सोनवणे (वय ४३) यांचे दि १२ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, बहीण, पुतणे असा परिवार आहे.

ते रिटायर एसटी ड्रायव्हर भगवान सोनवणे यांचे चिरंजीव व भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष प्रल्हाद सोनवणे यांचे लहान भाऊ होत.

# भुसावळमध्ये डीजे बंदीची कडक अंमलबजावणी

प्रतिनिधी । भुसावळ

## १५ जण हद्दपार; गुन्हेगारांची कुंडली काढण्याचे काम सुरू

**शहरात वाढते ध्वनीप्रदूषण आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न लक्षात घेता भुसावळ पोलिसांनी डीजे बंदीसाठी कडक अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार रात्री १० वाजल्यानंतर डीजे तसेच मोठ्या आवाजातील वाद्ये वाजविण्यावर पूर्ण नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पोलीस कर्मचारी नेमण्यात आले असून नियमभंग करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई केली जाणार आहे.**

शहरातील वाढती गुन्हेगारी पाहता हद्दपार तसेच एमपीडीए (महाराष्ट्र प्रतिबंधक नजरकैद कायदा) अंतर्गत कठोर कारवाईचा नवा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. भुसावळ शहर पोलीस स्टेशन आणि बाजारपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत व वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांवर ही कारवाई करण्यात येणार असून एकूण १५ जणांवर हद्दपार व एमपीडीए अंतर्गत प्रस्ताव पाठविण्याची तयारी सुरू आहे. या कारवाईसाठी संबंधित पोलीस ठाण्यांकडून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या संशयितांची नावे निश्चित करण्यात आली असून त्यांच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. कायदा-सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या व नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कडक पावले उचलली जातील, असे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांची सविस्तर माहिती (कुंडली) तयार करण्याचे काम सुरू असून, त्यांच्या गुन्ह्यांच्या स्वरूपानुसार कोणावर हद्दपार तर कोणाविरुद्ध एमपीडीएची कारवाई करायची याचे नियोजन करण्यात येत आहे. येत्या आठवडाभरात शहर व बाजारपेठ पोलीस ठाण्यातून हे प्रस्ताव तयार करून जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे रवाना करण्यात येणार आहेत. तसेच ग्रामीण भागातील संशयितांची नावे समाविष्ट करण्याचे कामही क्राईम विभागाकडून सुरू आहे. कायदा मोडणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नाही. कायदा सर्वात मोठा आहे आणि जो कायदा हातात घेईल त्याला त्याच कायद्याने उत्तर दिले जाईल, असा इशारा उपअधीक्षक केदार बारबोले यांनी दिला. गेल्या दोन दिवसांपासून तिन्ही पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील उपद्रवी, दादागिरी करणारे, चिथावणीखोर व कायदा हातात घेणाऱ्यांच्या गुन्ह्यांचा आढावा घेण्यात आला असून त्यांच्यावर धडक कारवाई केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. डीजे बंदी, प्रतिबंधात्मक कारवाई तसेच हद्दपार व एमपीडीए प्रस्तावांमुळे शहरात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होण्यास मदत होईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

### वाळूचा डंपर सोडण्यासाठी मागितली ३० हजारांची लाच

# लाचखोर मंडळ अधिकाऱ्यासह तलाठी जेरबंद

## मुद्देमाल जप्त; लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची धडक कारवाई

प्रतिनिधी । जळगाव

**वाळू वाहतूक करणारा डंपर सोडून देण्यासाठी आणि त्यावर कारवाई न करण्यासाठी ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ममुराबाद येथील तलाठी आणि म्हसावद येथील मंडळ अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. ही कारवाई दि. ११ फेब्रुवारी रोजी जळगाव शहरात करण्यात आली.**

या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या लोकसेवकांमध्ये सदानंद व्यंकटी मुंडे (वय ३४), तलाठी, सजा ममुराबाद, ता. जि. जळगाव (वर्ग-३) व अभिजित नामदेव येवले (वय ३९), मंडळ अधिकारी, सजा म्हसावद, ता. जि. जळगाव (वर्ग-३) यांचा समावेश आहे. तक्रारदार हे वाळू वाहतुकीचा व्यवसाय करतात. दि. ४ फेब्रुवारी रोजी रात्री गस्तीवर असताना तलाठी सदानंद मुंडे यांनी वाळूने भरलेला डंपर पकडला होता. मात्र, मंडळ अधिकारी अभिजित येवले यांनी फोनवरून दिलेल्या सूचनेनुसार तो डंपर कारवाई न करता सोडून देण्यात आला. या उपकाराच्या बदल्यात आणि पुढील कारवाई टाळण्यासाठी मुंडे आणि येवले या दोघांनी मिळून तक्रारदाराकडे ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती.

तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव येथे तक्रार नोंदवली. या तक्रारीची पडताळणी केली असता, तडजोडीअंती ३० हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले. एसीबीच्या पथकाने जुने जळगाव परिसरातील अभिजित येवले यांच्या घराच्या खाजगी कार्यालयात सापळा रचला. यावेळी तलाठी सदानंद मुंडे यांना ३० हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडण्यात आले. झडतीमध्ये सदानंद मुंडे यांच्याकडे रोख ४०,२०० रुपये आणि एक विवो कंपनीचा मोबाईल फोन तर अभिजित येवले यांच्याकडे रोख ७,६०० रुपये आणि एक विवो कंपनीचा मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

> याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी आणि सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सापळा पथकात पोलीस उपअधीक्षक योगेश ठाकूर, पोलीस निरीक्षक तथा तपास अधिकारी स्मिता नवघरे, रेश्मा अवतारे, सुरेश पाटील, बाळू मराठे, राकेश दुसाने, प्रदीप पोळ आणि चंद्रशेखर चौधरी यांचा समावेश होता. कोणत्याही लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्वरित टोल-फ्री क्रमांक १०६४ किंवा जळगाव एसीबी कार्यालयाशी ०२५७-२२३५४७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# पैशांच्या वादातून आईला शिवीगाळ

● मध्यस्थी करणाऱ्या भावावर लोखंडी पाईपने हल्ला

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या पंढरपूरनगर परिसरात पैशांच्या कारणावरून एका तरुणाने कुटुंबावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे.**

यापकरणी पोलिसांनी संशयित आरोपी शंतनू चंद्रकांत गुरव (रा. हनुमान नगर, अयोध्या नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार मयूर चंद्रकांत गुरव (वय २१, रा. पंढरपूरनगर) हे आपल्या कुटुंबासह राहतात. २ फेब्रुवारी रोजी रात्री ११.३० च्या सुमारास संशयित आरोपी शंतनू हा मयूरच्या घरी आला आणि त्याने मयूरच्या आईकडे पैशांची मागणी केली. मात्र, आईने सध्या माझ्याकडे पैसे नाहीत, असे स्पष्ट सांगताच शंतनूचा राग अनावर झाला. शंतनूने मयूरच्या आईला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. जेव्हा मयूर आणि त्याच्या वडिलांनी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, तेव्हा शंतनूने त्याच्या हातातील लोखंडी पाईपने मयूरच्या डोक्यावर जोरात प्रहार केला, ज्यामुळे तो गंभीर जखमी झाला. इतकेच नव्हे तर, आरोपीने मयूरच्या आई-वडिलांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी देऊन तेथून पळ काढला. या घटनेनंतर मयूर गुरव याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. यावरुन आरोपी शंतनू गुरवविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. यापकरणी पोलीस हेड कॉन्स्टेबल संजीव मोरे तपास करीत आहेत.

## थोडक्यात

### संत नरहरी महाराज लाड सुवर्णकार मंडळाच्या अध्यक्षपदी सोनार

**जळगाव ।** येथील श्री संत नरहरी महाराज लाड सुवर्णकार मंडळाच्या अध्यक्षपदी विजय सोनार, तर उपाध्यक्ष राजेंद्र पल्लीवाळ यांची निवड करण्यात आली. मावळते अध्यक्ष ॲड. कैलास सोनार यांच्या अध्यक्षीय कार्याचा आढावा माजी अध्यक्ष सुनील कपोते यांनी सभेसमोर मांडला. या सभेत पुढील तीन वर्षाकरिता श्री संत नरहरी महाराज लाड सुवर्णकार मंडळाच्या अध्यक्षपदी विजय प्रभाकर सोनार तर उपाध्यक्षपदी राजेंद्र अरुण पल्लीवाळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

### जिल्हास्तरीय स्पर्धेत बारी समाज विद्यालयाचा डंका

**शिरसोली ।** विभागीय वन अधिकारी व सामाजिक वनीकरण विभाग, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेरी लाईफ प्रकल्प थीम अंतर्गत जिल्हास्तरीय स्पर्धेत शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यालयाच्या हरित सेनेतर्फे सादर करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाने जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत जळगाव जिल्ह्यातील सुमारे ५६ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत बारी समाज विद्यालयाच्या पायल बारी आणि भूमिका पाटील या विद्यार्थिनींनी डोमेस्टिक नॉन इलेक्ट्रिकल व्हेईकल वॉशर हे मॉडेल सादर केले. विभागीय वन अधिकारी एम.एस.झांजुर्णे यांच्या हस्ते विजेत्या विद्यार्थिनींना गौरविण्यात आले.

### मू.जे.महाविद्यालयात रामायणावर राष्ट्रीय चर्चासत्र

**जळगाव ।** मूळजी जेठा महाविद्यालयाचे संस्कृत विभाग व धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर संस्थेच्या संयुक्त विद्यमाने समर्थ रामदास स्वामींचे हस्तलिखित रामायण व वाल्मिकी रामायण यांचे समीक्षात्मक पाठ संपादन या महत्वपूर्ण विषयावर राष्ट्रीय संगोष्ठीचे आयोजन दि. १४ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. हे कार्यक्रम सकाळी १० पासून ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत चालणार आहे. या कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून क.ब.चौ.उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील मानव विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. जगदीश पाटील, सीए प्रकाश पाठक, डॉ. मृणालिनी फडणवीस, मुंबईचे प्रा.निलेश जोशी, समर्थ वाग्देवता मंदिर संस्थेचे शरद कुबेर, डॉ. प्रसाद भंडारी, डॉ.व्ही.एस.कंची आदी या चर्चासत्रात मार्गदर्शन करणार आहेत.

# फार्मर कप प्रशिक्षणासाठी शेतकरी रवाना

## जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दाखवली बसला हिरवी झेंडी

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव तालुक्यातील कृषी विभाग व उमेद अभियानांतर्गत महिला व पुरुष शेतकरी, पाणी फाउंडेशनच्या फार्मर कप निवासी प्रशिक्षणासाठी के.व्ही.के. जळगाव जामोद सेंटर, जिल्हा बुलडाणा येथे रवाना झाले. या प्रशिक्षणाचा उद्देश शेतकऱ्यांना जलसंधारण, शाश्वत शेती पद्धती व ग्रामविकास विषयक मार्गदर्शन करणे हा आहे.**

या प्रसंगी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या बसला हिरवी झेंडी दाखविण्यात आली. यावेळी प्रोजेक्ट डायरेक्टर तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे संचालक राजू लोखंडे, जिल्हा कृषी अधीक्षक कुरबान तडवी, उपविभागीय कृषी अधिकारी श्रीमती देसले, कृषी अधिकारी स्नेहल थेऊरकर, बीडिओ चंद्रकांत बोडरे, उमेद तालुका अभियान व्यवस्थापक देवेंद्र सुर्यवंशी तसेच पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसुळे, उपविभागीय समन्वयक सुहास मोहिते, प्रियंका बैसाणे व तेजस निकुंभ आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते बसला हिरवी झेंडी दाखवून शेतकऱ्यांना प्रशिक्षणासाठी रवाना करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी घुगे यांनी शेतकरी बांधवांना शुभेच्छा देत फार्मर कप प्रशिक्षणात जास्तीत जास्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी जलसंवर्धन व शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.




# परळी वैजनाथ येथील अखिल भारतीय पशू-पक्षी प्रदर्शन

● महापशुधन एक्स्पो-२०२६ च्या अधिकृत लोगोचे जिल्हाधिकाऱ्यांच्याहस्ते अनावरण




प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्यावतीने आगामी १३ ते १५ फेब्रुवारी या कालावधीत परळी वैजनाथ, जि.बीड येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो-२०२६ प्रदर्शनाच्या अधिकृत लोगोचे अनावरण बुधवारी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात झाले.

यापसंगी महानगरपालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, उपसंरक्षक राम धोत्रे, आदित्य मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी राहुल इधे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त व दुग्ध व्यवसाय डॉ. प्रदिप झोड, सहाय्यक पशुसंवर्धन अधिकारी डॉ.हेमंत कुमावत उपस्थित होते. लोगो अनावरणानंतर बोलताना जिल्हाधिकारी रोहन घुगे म्हणाले की, पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे प्रदर्शन देशातील जातीवंत पशुधन आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम असणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान घरबसल्या पाहायला मिळणार आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक आणि शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट देऊन आपले ज्ञान व उत्पन्न वाढवावे, असे आवाहन त्यांनी केले. महा पशुधन एक्स्पो, २०२६ प्रदर्शनाची मुख्य आकर्षणे संदर्भात जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांनी प्रदर्शनाबाबत म्हणाले की, या प्रदर्शनात राज्यातील व राज्याबाहेरील जातीवंत गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या आणि पक्ष्यांच्या विविध प्रजातींचे दर्शन घडणार आहे.

आधुनिक डेअरी फार्मिंग, चारा नियोजन आणि प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स असणार आहेत. पशुधनाचे आरोग्य, लसीकरण आणि वैज्ञानिक संगोपन यावर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित केली आहेत.

आजच्या लोगो अनावरणानंतर संपूर्ण जिल्ह्यात प्रदर्शनाची व्यापक प्रसिद्धी मोहीम राबवण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्था, पंचायत समिती आणि सार्वजनिक ठिकाणी बॅनर व पोस्टर्सच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही घरपोच माहिती देण्याचे नियोजन विभागाने केले आहे.

तरी, जिल्ह्यातील सर्व पशुपालक बांधवांनी या महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# सावदा पोलिस ठाण्यातील वादप्रकरणी आ. खडसे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**सावदा पोलिस ठाण्यात शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याच्या आरोपावरून विधान परिषदेचे सदस्य आ. एकनाथराव खडसे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक विशाल पुंडलिक पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.**



याबाबत माहिती अशी की, दि. ११ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे बारा वाजण्याच्या सुमारास आ. खडसे हे सावदा पोलिस ठाण्यात आले होते. एका प्रकरणात गुन्हा नोंद न झाल्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली. या वेळी पोलिस ठाण्यात वादावादी झाल्याचे सांगण्यात येत आहे. तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, संबंधित घटनेदरम्यान शासकीय कामकाजात व्यत्यय निर्माण झाला तसेच अधिकाऱ्यांशी बोलताना अयोग्य भाषेचा वापर करून दमदाटी करण्यात आल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत आ.खडसे यांनी कायदेशीर लढाईला सामोरे जाणार असल्याचे सांगितले.

# दिव्यांग लाभार्थ्यांनी यूआयडी आधार संलग्नतेसाठी कागदपत्रे सादर करावीत

प्रतिनिधी । जळगाव

**ग्रामीण तालुक्यातील विशेष सहाय्य योजनेंतर्गत पात्र सर्व दिव्यांग लाभार्थ्यांनी शासन निर्णय दि. २० ऑगस्ट २०२५ नुसार आपले यूआयडी कार्ड आधार कार्डशी संलग्न करणे बंधनकारक असल्याची माहिती तहसीलदार डॉ. शीतल राजपूत यांनी दिली आहे.**

या योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी अद्याप आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत, त्यांनी आपले यूआयडी कार्ड व प्रमाणपत्र, अद्यावत आधार कार्ड तसेच बँक पासबुक यासह २० फेब्रुवारी २०२६ पूर्वी संजय गांधी योजना शाखा, तहसील कार्यालय, जळगाव येथे कागदपत्रे सादर करून माहिती अद्यावत करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ज्या लाभार्थ्यांच्या खात्यात २ हजार ५०० रु.अनुदान जमा झाले आहे, त्यांनी देखील अनिवार्यपणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

शासन निर्देशानुसार, ज्या लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पडताळणी करून माहिती अद्यावत केली नाही, त्यांची माहिती अद्यावत केली जाणार नाही व संबंधित लाभाबाबत शासन निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# गावठी कट्ट्यासह दहशत माजवणारा तरुण जेरबंद

## तीन जिवंत काडतुसे जप्त ; जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात गावठी कट्टा बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. त्याच्याकडून १ गावठी कट्टा आणि ३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत.**



जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी जिल्ह्यात बेकायदेशीर अग्निशस्त्रे बाळगणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या मोहिमेदरम्यान, १० फेब्रुवारी रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना गुप्त माहिती मिळाली की, शाहुनगर भागातील मोहम्मद साद अय्युब खान हा तरुण उस्मानिया पार्क परिसरात मोटारसायकलवर गावठी कट्टा घेऊन फिरत आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रात्रीच्या वेळी उस्मानिया पार्क परिसरात सापळा रचून मोहम्मद साद याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी कट्टा आणि ३ जिवंत काडतुसे सापडली. पोलिसांनी त्याचे शस्त्र आणि मोटारसायकल जप्त केली आहे. यापकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीला पुढील कारवाईसाठी जळगाव शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, पोलीस हवालदार सुनील पाटील या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक शरद बागल, अतुल वंजारी, विजय पाटील, अक्रम शेख, नितीन बावीस्कर, विलेश सोनवणे, किशोर पाटील आणि रवींद्र कापडणे यांच्या पथकाने सहभाग घेतला.

# जळगाव जिल्हा परिषद ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात राज्यस्तरावर अव्वल

प्रतिनिधी । जळगाव



**प्रशासनात पारदर्शकता वाढविणे आणि नागरिकांना शासकीय सेवा सहज, सोप्या, परिणामकारक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे राबविण्यात आलेल्या १५० दिवसांच्या विशेष सेवाकर्मी ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात जळगाव जिल्हा परिषदेला राज्यातील सर्वोत्तम कामगिरीसाठी अव्वल स्थान प्राप्त झाले आहे.**

जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या नेतृत्वाखाली जळगाव जिल्हा परिषदेने ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर, ऑनलाइन सेवा वितरण, प्रलंबित प्रकरणांची वेळेत पूर्तता तसेच तक्रार निवारण व्यवस्थेचे सुदृढीकरण यांसारखे विविध उपक्रम यशस्वीरित्या राबविले.

या उपक्रमांमुळे कामकाजात गती, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढले. असून नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. राज्य शासनाने जळगाव जिल्हा परिषदेच्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत राज्यस्तरावर गौरव केला आहे. ही कामगिरी अधिकारी व कर्मचारी यांच्या समन्वयातून साध्य झाली असल्याची भावना सीईओ करनवाल यांनी व्यक्त केली.

# आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी रास्तारोकोचा इशारा दिल्याने रस्ता दुरुस्तीला वेग

प्रतिनिधी । चोपडा

**अंकलेश्वर-बऱ्हाणपूर या राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्याची दयनीय अवस्था लक्षात घेता स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी तीव्र नाराजी व्यक्त करत दुरुस्तीची मागणी केली होती. रस्त्याचा पृष्ठभाग अनेक ठिकाणी उखडलेला असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. विशेषतः चोपडा-शिरपूर बायपास तसेच हॉटेल जयेश समोरील रस्ता अत्यंत खराब झाल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यापूर्वी दुरुस्ती करण्यात आलेल्या पुलांवरील पृष्ठभागही पुन्हा खराब झाल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.**

या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, जळगाव येथील प्रकल्प संचालकांना निवेदन देत संबंधित



रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात झाल्याने वाहनचालक व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, उर्वरित भागातील कामेही तातडीने पूर्ण करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ठेकेदारामार्फत तात्काळ दुरुस्ती करून १४ फेब्रुवारीपर्यंत सिलकोटचे काम पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा रास्तारोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला होता.

या इशाऱ्याची दखल घेत एनएचएआयने त्वरित हालचाल करत शिरपूर बायपास रस्त्यावरील हॉटेल जयेश समोरील काँक्रीटीकरणाच्या कामास सुरुवात केली आहे. या ठिकाणी भेट देऊन आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांनी कामाची पाहणी केली. काम उत्कृष्ट दर्जाचे व निर्धारित मुदतीत पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना व ठेकेदारास दिले.

## कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबवा!

प्रतिनिधी । रावेर

**आगामी दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी सोमवारी पोलीस स्टेशन येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.**

ही बैठक पोलीस निरीक्षक डॉ.विशाल जयस्वाल यांच्या दालनात घेण्यात आली. जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त सूचनांनुसार परीक्षा काळात कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी कडक उपाययोजना राबविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही अनधिकृत इसमाला प्रवेश दिला जाणार नाही. तसेच परीक्षेच्या कामकाजासाठी उपस्थित असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणे बंधनकारक केले आहे.

## थोडक्यात

### गोवंश निर्दयीपणे वाहतूक करणारी दोन वाहने पकडली

**अमळनेर ।** शहरातील सुभाष चौक आणि तेली भवन परिसरात गोवंश अत्यंत निर्दयीपणे आणि बेकायदेशीरपणे वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी ४ गोवंश सुटका केली असून, दोन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. जनावरांना निर्दयीपणे कत्तलीच्या उद्देशाने नेले जात असल्याचा संशय पोलिसांना आला.

### परीक्षा काळात ध्वनीक्षेपकांचा आवाज मर्यादित ठेवा : महापौर काळे

**जळगाव ।** राज्यात सध्या उच्च माध्यमिक (१२ वी) परीक्षा सुरू असून दि. २० फेब्रुवारीपासून माध्यमिक (१० वी) परीक्षांना प्रारंभ होत आहे. शहरातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षा नियोजनबद्ध पद्धतीने सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर परीक्षा कालावधीत शांतता राखणे अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन करत महापौर दीपमाला काळे यांनी नागरिक व आयोजकांना जाहीर आवाहन केले आहे.

## चोपडा येथील पंकज ग्लोबल स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**विज्ञान ही केवळ ज्ञानाची शृंखला नसून विचार करण्याची एक पद्धत आहे, या ख्यातनाम शास्त्रज्ञ कार्ल सेगन यांच्या विचाराला अनुसरून पंकज ग्लोबल पब्लिक स्कूल, चोपडा येथे मंगळवारी भव्य विज्ञान प्रदर्शनी उत्साहात पार पडली.**

या विज्ञान प्रदर्शनीत प्री-प्रायमरी ते इयत्ता ९ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, भाषा, कला आणि सर्जनशीलता




या विविध क्षेत्रांतील प्रकल्प सादर करून विद्यार्थ्यांनी आपली कल्पकता व अभ्यासपूर्ण तयारी प्रभावीपणे मांडली. प्रदर्शनातील प्रमुख आकर्षण ठरले ते २० रोबोटिक्स प्रकल्प आणि १७ कोडिंग प्रकल्प. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत नाविन्यपूर्ण संकल्पना सादर केल्या. संगणक विभागात एम.एस. वर्ड, पॉवरपॉईंट, एक्सेल आदी अनुप्रयोगांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्री-प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांच्या चित्रकला व हस्तकला स्टॉल्सनी विशेष लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाला कलात्मक स्पर्श देण्यासाठी संगीत शिक्षक नितीन वाल्हे यांनी प्रेरणादायी संगीत सादर करून वातावरण अधिक आनंदमय केले. सकाळी ९.३० वाजता संस्थेचे अध्यक्ष पंकज बोरोले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. सुरेश बोरोले, उपाध्यक्ष अविनाश राणे, प्राचार्य मिलिंद पाटील, समन्वयक शारदा मॅडम व उपमा जैस्वाल उपस्थित होते. कार्यक्रमास डॉ. दुर्गेश जैस्वाल,डॉ. राहुल पाटील, डॉ. पराग पाटील, डॉ. अतुल पाटील, डॉ. सचिन कोल्हे, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. वर्षा पाटील, डॉ. अक्षय पाटील, डॉ. आनंद जाखटे, डॉ.जागृती सुराणा, सचिन पाटील यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले.

## महात्मा फुले पुतळा विटंबनाप्रकरणी पोलिसांना निवेदन

प्रतिनिधी । वरणगाव

**तेलंगणा येथील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना झाली. या घटनेचा निषेध म्हणून महात्मा फुले समता परिषदेतर्फे वरणगाव पोलिस स्टेशनला निवेदन देऊन दोषींवर कठोर कारवाई करून अटक करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.**




तेलंगणा राज्यातील संगापूर जिल्ह्यातील तेलापूर येथे काही विघ्नसंतोषी माथेफिरुनी क्रांतिसूर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना केली. विटंबना करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून अटक करावी, अशी मागणी पोलिस स्टेशनला दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे महिला तालुकाध्यक्ष सविता माळी, माळी समाज अध्यक्ष संजय माळी, कृष्णा माळी, संदीप माळी, सरिता माळी, बबलु माळी, सुरेखा देशमुख यांची उपस्थिती होती.

## धरणगाव तालुक्यात तापमानात वाढ; उन्हाचे चटके जाणवू लागले

प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव शहरासह तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे, पिंप्री, वाघळुद परिसरात उन्हाचा पारा वाढला असून वातावरण तापू लागले आहे.**

यावर्षी पावसाळा अधिक झाल्याने वातावरणात गारवा जास्त प्रमाणात आहे. फेब्रुवारीचा पहिला आठवडा संपला तरी देखील रात्री थंडी जाणवते. परंतु, दिवसा मात्र उन्हाचे चटके बसू



लागले असल्याने उन्हाळ्याची चाहूल लागण्यास सुरूवात झालेली आहे.

सकाळी मात्र दवबिंदू (ओस) पडण्याचे प्रमाण अधिक आहे. लग्नसराई देखील सुरू झाल्याने शीतपेयांची विक्री देखील वाढू लागली आहे. सकाळी ११ वाजेपासूर दुपारी ३ वाजेपर्यंत वातावरणात उष्णता निर्माण होत आहे. पारा चढू लागला आहे. दरम्यान, यावर्षी पावसाळा अधिक झाल्याने वातावरणात आद्रता जास्त राहिल, अशी शक्यता जाणकार व्यक्त करू लागले आहेत.

## आरोग्य सभापती रमेश शिंदे यांनी गटार, साफसफाईची प्रत्यक्ष केली पाहणी

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपालिके मार्फत साफसफाई व स्वच्छता मोहीम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात आली आहे. नगरपालिकेचे स्वच्छता, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती रमेश शिंदे यांनी विविध भागात भेट दिली व स्वच्छतेच्या कामाबाबत मार्गदर्शन केले .**

शहरातील नवलपुरा,



मन्यारअडी भागात गटार सफाई करण्यात आली. आरोग्य सभापती रमेश शिंदे व आरोग्य निरीक्षक व्ही.के. पाटील यांनी स्वतः जागेवर जाऊन पाहणी केली. तसेच कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या. स्वस्तिक टाकी , ग्रामीण पोलीस स्टेशन परिसरात रस्ते सफाई करण्यात आली. याठिकाणी आवर्जून उपस्थिती देत सभापती पहिल्यांदाच रस्त्यावर उतरल्याचे चित्र पाहावयास मिळाले. आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्षा नम्रता पाटील व त्यांचे सर्व सभापती, नगरसेवक आणि मुख्याधिकारी रामनिवास झंवर तसेच पालिकेचे सर्व अधिकारी, कर्मचारी जोमाने कामास लागले आहेत. एकंदरीत शहराचा लवकरच कायापालट होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दरम्यान नव्याचे नऊ दिवस असे तर होणार नाही ना ? अशी शंकाही शहरवासीयांनी उपस्थित केली आहे.

## प्रवक्ता अकॅडमीतर्फे डिजिटल थेरी कॉम्पिटिशनचे आयोजन

प्रतिनिधी । पारोळा

**प्रवक्ता अकॅडमी, पारोळा यांच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस चालना देण्यासाठी डिजिटल थेरी कॉम्पिटिशनचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा दि. ७ रोजी अकॅडमीच्या प्रांगणात पार पडली.**

या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांची अभ्यासाची क्षमता वाढवणे, विषयांचे पुनरावलोकन व प्रॅक्टिस करणे, आत्मविश्वास व नेतृत्वगुण विकसित करणे तसेच विचारशक्ती, तर्कशक्ती व टीमवर्क वाढवणे हा होता. स्पर्धेमध्ये डिजिटल थेरी अंतर्गत शिकवलेले विविध विषय समाविष्ट होते. स्पर्धा मुलींचा व मुलांचा अशा दोन गटांमध्ये घेण्यात आली. प्रश्न व काउंटर प्रश्नांच्या माध्यमातून गुणांकन करण्यात आले. चुरशीच्या लढतीनंतर मुलींच्या संघाने विजय मिळवला. मुलींच्या संघाची कॅप्टन म्हणून स्वरा मराठे यांनी प्रभावी नेतृत्व केले.

## धरणगावात महाशिवरात्रीनिमित्त शिवमहोत्सव

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील श्री भोले सरकार राजराजेश्वर श्री सार्जेश्वर महादेव मंदिर भक्त परिवाराच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त सालाबादप्रमाणे यंदाही भव्य शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.**

शिवभक्तांसाठी श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी यानिमित्ताने उपलब्ध होणार आहे. येत्या रविवार रोजी महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत सुमारे २० पेक्षा अधिक आकर्षक झाक्या (देखावे) सहभागी होणार आहेत. त्यामध्ये भुतों



की बारात, कालीमाता, बाबा बर्फानी, महाकाल यांसारख्या विविध धार्मिक व आकर्षक देखाव्यांचा समावेश असणार आहे. झाक्यांमधून भगवान शंकराच्या विविध रूपांचे दर्शन घडणार असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्सुकता आहे. मिरवणूक रामदेवजी बाबा नगर येथून प्रारंभ होऊन दरवर्षीप्रमाणे नियोजित मार्गाने शहरातून मार्गक्रमण करणार आहे.

ढोल-ताशे, भक्तिगीत आणि हर हर महादेवच्या जयघोषात वातावरण भक्तिमय होणार आहे. या पवित्र सोहळ्यात धरणगाव तसेच परिसरातील जास्तीत जास्त शिवभक्तांनी सहभागी व्हावे व कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन मंदिर भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. महाशिवरात्रीनिमित्ताने आयोजित हा शिवमहोत्सव धरणगावकरांसाठी भक्ती, संस्कृती आणि एकात्मतेचा उत्सव ठरणार आहे.यासाठी भाविकांनी दर्शनाचा अवशश्य लाभ घ्यावा.

## धरणगाव तालुक्यात बारावीच्या परीक्षा शांततेत



प्रतिनिधी । धरणगाव

**धरणगाव तालुक्यात बारावीच्या परीक्षेला काल शांत, शिस्तबद्ध आणि सुरळीत वातावरणात प्रारंभ झाला. तालुक्यातील तीनही परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीत परीक्षा सुररू असल्याने कॉपीमुक्त अभियानाला खऱ्या अर्थाने बळ मिळाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**

शहरात पी.आर. हायस्कूल, इंदिरा गांधी कनिष्ठ महाविद्यालय तसेच सारजाई कुडे विद्यालय हे उपकेंद्र कार्यरत असून पाळधी येथे भाऊसाहेब गुलाबरावजी पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे परीक्षा केंद्र आहे. पहिल्याच दिवशी सर्व केंद्रांवर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने परीक्षा दिली. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे परीक्षेची पारदर्शकता वाढली आहे. कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा होत असल्याने अभ्यासू विद्यार्थ्यांमध्ये समाधान व्यक्त

### सीसीटीव्ही निगराणीमुळे कॉपीमुक्त अभियानाला बळ; प्रशासनाच्या भेटींनी समाधान

होत आहे. तर, गैरप्रकारांवर अवलंबून राहणाऱ्या काही विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असल्याचेही दिसून आले. गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले यांनी सांगितले की, सीसीटीव्ही निगराणीमुळे कॉपीमुक्त अभियानाला प्रभावी सुरुवात झाली आहे. परीक्षा प्रक्रियेतील शिस्त आणि पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी शिक्षण विभाग कटिबद्ध आहे. पंचायत समिती शिक्षण विभागाकडून सर्व केंद्रांवर बैठे पथक तैनात करण्यात आले असून गटविकास अधिकारी यांच्या पथकानेही केंद्रांना भेट देत व्यवस्थेचा आढावा घेतला. तसेच नायब तहसीलदार संदीप मोरे यांच्या नेतृत्वात महसूल विभागाच्या पथकाने केंद्रांना भेटी देऊन समाधान व्यक्त केले. परीक्षेदरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी बंदोबस्त तैनात आहे.

# महात्मा फुले यांच्या पुतळ्याची विटंबना

## धरणगावात सकल माळी समाजातर्फे तीव्र निषेध; तहसीलदारांना दिले निवेदन

प्रतिनिधी । धरणगाव

**तेलंगणा राज्यातील तेल्लापूर येथे (ता.७) रोजी, सामाजिक व शैक्षणिक क्रांतीचे अग्रदूत, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्याची समाजकंटकांकडून करण्यात आलेली विटंबना ही अत्यंत निंदनीय व संतापजनक घटना आहे. या घटनेच्या निषेधार्थ धरणगाव येथे सकल माळी समाजाच्या वतीने तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.**

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या



पुतळ्याची विटंबना म्हणजे केवळ एका महापुरुषाचा अपमान नसून, देशातील सामाजिक विचारधारा, समता, न्याय व शिक्षणाच्या मूल्यांवर केलेला थेट हल्ला आहे. अशा हीन कृत्याचा आणि या कृत्यात सहभागी असलेल्या समाजकंटकांचा सकल माळी समाज तीव्र शब्दांत निषेध करीत आहे. महात्मा फुले व सावित्रीमाई फुले यांनी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून समाजातील वंचित, दुर्बल घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. शिक्षणाच्या बळावर विवेकी, विचारशील व स्वाभिमानी पिढी घडविण्याचे महान कार्य त्यांनी केले. अशा थोर महापुरुषांच्या विचारांची व पुतळ्यांची विटंबना होणे हे संपूर्ण समाजासाठी लज्जास्पद असून, महाराष्ट्र हे कदापि सहन करणार नाही, अशा भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केल्या. यावेळी माळी समाजाध्यक्ष व्ही. टी. माळी, रामकृष्ण महाजन, उपाध्यक्ष शिवाजीराव देशमुख, सोमनाथ माळी, सचिव आर. डी. महाजन, राजेंद्र महाजन यांच्यासह समाजाचे ज्येष्ठ नेते विठोबा माळी, गुलाबराव वाघ, ड.संजय महाजन, कैलास माळी, उपनगराध्यक्षा सुरेखा महाजन, विजय महाजन, के.आर.वाघ, भटूलाल महाजन, दिपक महाजन, रवींद्र महाजन, तुळशीराम भगत, हेमंत माळी, पी डी पाटील, डॉ.नरेंद्र पाटील, गणेश माळी, टोनी महाजन, प्रल्हाद माळी आदी समाजबांधव उपस्थित होते.